महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२६/प्र.क्र.०७/केंप्रप्र/सूचना/२०२६/१९८६ दिनांक - १३.०८.२०२६

## जाहीर सूचना

## तंत्रशिक्षण विभागांतर्गत विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांसाठी

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता तंत्रशिक्षण विभागांतर्गत विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील आवश्यक माहिती सहज उपलब्ध व्हावी, प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता राहावी तसेच विद्यार्थ्यांना व पालकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी खालील माहिती संस्थेच्या संकेतस्थळाच्या होम पेजवर तसेच संस्थेच्या सूचना फलकावर ठळकपणे प्रदर्शित करणे आवश्यक आहे.

**प्रदर्शित करावयाची माहिती :**

१. आवश्यक कागदपत्रांची यादी प्रवेशासाठी संस्थेकडून आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची अभ्यासक्रमनिहाय व श्रेणीनिहाय (Category-wise) संपूर्ण यादी प्रदर्शित करावी.

२. FRA मान्यताप्राप्त शुल्क संरचना शुल्क नियामक प्राधिकरण (FRA) यांनी मान्य केलेली शुल्क संरचना प्रवर्ग निहाय स्पष्टपणे प्रदर्शित करावी.

३. विविध शिष्यवृत्ती संबंधीत माहिती स्पष्टपणे प्रदर्शित करावी.

४. संस्थेचे बँक तपशील व ऑनलाईन पेमेंट तपशील तसेच शुल्क भरण्याबाबतच्या आवश्यक सूचना स्पष्टपणे नमूद कराव्यात.

५. प्रवेश प्रक्रियेबाबत संपूर्ण मार्गदर्शक सूचना विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी आवश्यक असलेली संपूर्ण माहिती, जसे की-
- प्रवेश प्रक्रियेसाठी निश्चित केलेला खोली क्रमांक
- संबंधित अधिकारीचे नाव व संपर्क क्रमांक
- प्रवेश प्रक्रियेची वेळ व कालावधी
- आवश्यक कागदपत्रे
- शुल्क भरण्याची प्रक्रिया
- अंतिम प्रवेश निश्चिती बाबतच्या सुचना
- इतर आवश्यक प्रवेशविषयक सूचना

ही माहिती स्पष्ट व अद्ययावत स्वरूपात प्रदर्शित करावी.

वरील सर्व माहिती संस्थेच्या संकेतस्थळाच्या होम पेजवर सहज उपलब्ध होईल अशा पद्धतीने तसेच संस्थेच्या सूचना फलकावर ठळकपणे प्रदर्शित करण्यात यावी.

तसेच, प्रदर्शित करण्यात आलेली माहिती वेळोवेळी अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. यासंबंधी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सीईटी कक्षास सादर करावा.

सही/-
(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(सीईटी) कक्ष, मुंबई